02 OCT 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# देसाई अध्यासन कामास गती देणार

## मंत्री शंभूराज देसाई; विद्यापीठास अडीच कोटींचा निधी देण्यासाठी पूर्तता करू

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनाच्या कामाला गती देण्यासाठी शासन व व्यक्तिगत स्तरावर सर्वतोपरी प्रयत्न करू, अशी ग्वाही राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी आज येथे दिली. अध्यासनासाठी मंजूर तीन कोटींमधील उर्वरित अडीच कोटींचा निधी तातडीने विद्यापीठास वितरित करण्यासाठी आवश्यक त्या पूर्तता करण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शिवाजी विद्यापीठात लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनाच्या अनुषंगाने झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीत अध्यासनाच्या कामकाजाची अडचणींची व भविष्यात करता येऊ शकणाऱ्या विविध विधायक कामांची माहिती घेतली.

### स्मारकासाठी ७५ लाख राज्य सरकार देणार

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत श्री. देसाई यांनी लोकनेते बाळासाहेब देसाई स्मारकाची माहिती घेतली. तसेच स्मारकासाठी ७५ लाख रुपयांचा प्रस्ताव तयार करून पाठवावा, अशी सूचना केली.

श्री. देसाई म्हणाले, 'लोकनेते देसाई यांचे विद्यापीठाच्या उभारणीमधील योगदान अतुलनीय आहे. नव्या पिढीला त्यांच्या लोकनेते कार्याची माहिती होण्याच्या दृष्टीने अध्यासनातर्फे विविध उपक्रमांच्या माध्यमातून प्रयत्न होणे आवश्यक आहे. त्या मदतीसाठी शासन तत्पर असून, शासनाव्यतिरिक्त



कोल्हापर : बाळासाहेब देसाई यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना शंभूराज देसाई. शेजारी डॉ. प्रमोद पाटील, जिल्हाधिकारी रेखावार आदी.

विविध उद्योग-व्यवसायांच्या सामाजिक दायित्व निधीमधूनही निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून नावीन्यपूर्ण योजनेंतर्गत निधीची तरतूद करण्याची सूचना त्यांनी जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांना केली. अध्यासनाच्या कामाला गती देण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, पालकमंत्री दीपक केसरकर यांच्यासमवेतही चर्चा करू, असेही त्यांनी सांगितले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते श्री. देसाई यांचा सत्कार करण्यात आला. अध्यासनाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील, माजी आमदार डॉ. सुजित मिणचेकर, शिवराज देसाई, जिल्हाधिकारी रेखावार, उच्च व तंत्रशिक्षण उपसंचालक हेमंत कठरे, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. भारती पाटील, डॉ. अरुण भोसले, व्ही. जी. पानस्कर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
02 OCT 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनाला गती देणार

## मंत्री शंभूराज देसाई : विद्यापीठास निधी वितरित करण्यासाठी पूर्तता करू



**कोल्हापूर : लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना मंत्री शंभूराज देसाई, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी.**

**कोल्हापूर :** नव्या पिढीला लोकनेते देसाई यांचे उत्तुंग कार्य माहिती होणे आवश्यक आहे. शिवाजी विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनाच्या कामाला गती देण्यासाठी शासकीय, तसेच व्यक्तिगत स्तरावर सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही राज्याचे उत्पादन शुल्कमंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

शनिवारी शिवाजी विद्यापीठात लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनाच्या अनुषंगानें आढावा बैठक घेतली. या बैठकीमध्ये अध्यासनाच्या कामकाजाची, विशेषतः अडचणींची आणि भविष्यात करता येऊ शकणाऱ्या कामांची माहिती घेतली.मंत्री देसाई म्हणाले, नव्या पिढीला लोकनेते देसाई यांचे उत्तुंग कार्य माहिती होण्याच्या दृष्टीने या अध्यासनाच्या माध्यमातून विविध उपक्रमांच्या माध्यमातून प्रयत्न होणे आवश्यक आहे. त्यासाठी मदत देण्यास शासन तत्पर असून, अध्यासनासाठी मंजूर करण्यात आलेल्या तीन कोटींमधील उर्वरित अडीच कोटींचा निधी तातडीने विद्यापीठास वितरित करण्यासाठी आवश्यक त्या पूर्तता करण्यात येतील. विद्यापीठाच्या वस्तुसंग्रहालय संकुलामध्ये लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या जीवनकार्यावर प्रकाशझोत टाकणारे स्वतंत्र कलादालन निर्माण करण्यात यावे.

अध्यासनाच्या कामाला गती देण्यासाठी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, पालकमंत्री दीपक केसरकर यांच्यासमवेतही चर्चा करू, असेही त्यांनी सांगितले.प्रारंभी मंत्री देसाई यांच्या हस्ते लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. अध्यासनाचे प्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी अध्यासनाविषयी सादरीकरण केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, माजी आमदार डॉ. सुजित मिणचेकर, शिवराज देसाई, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, उच्च व तंत्रशिक्षण उपसंचालक हेमंत कठरे, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अजित चौगुले, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. भारती पाटील, डॉ. अरुण भोसले, व्ही. जी. पानस्कर आदी उपस्थित होते.

## पुतळा सुशोभीकरण कामास गती द्या...

मध्यवर्ती एसटी बसस्थानक परिसरात असलेल्या लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या पुतळा सुशोभीकरण कामास गती द्यावी. यासाठी शासन स्तरावरून आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही राज्य उत्पादन शुल्कमंत्री शंभूराज देसाई यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या पुतळा सुशोभीकरण कामाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस माजी आमदार डॉ. सुजित मिणचेकर, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, महापालिका आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्यासह महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते. मंत्री देसाई म्हणाले, लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या पुतळा सुशोभीकरणाचे काम दर्जेदार आणि गतीने होणे गरजेचे आहे. या कामासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. तत्पूर्वी त्यांनी लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

02 OCT 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बाळासाहेब देसाई अध्यासन कामास गती देणार

## मंत्री शंभूराज देसाई

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनाच्या कामास गती देण्यासाठी शासकीय आणि व्यक्तिगत स्तरावर सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही राज्य उत्पादन शुल्कमंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

शनिवारी विद्यापीठात झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. मंत्री देसाई म्हणाले, लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे शिवाजी विद्यापीठाच्या उभारणीमधील योगदान अतुलनीय आहे. अध्यासनाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविणे गरजेचे आहे. अध्यासनासाठी मंजूर तीन कोटी रुपयांमधील उर्वरित अडीच कोटी रुपयांचा निधी तातडीने विद्यापीठास वितरित करण्यात येतील.

अध्यासनाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी अध्यासनाविषयी सादरीकरण केले. विद्यापीठाच्या वस्तुसंग्रहालय संकुलात लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या जीवनकार्यावर प्रकाशझोत टाकणारे स्वतंत्र कलादालन निर्माण करण्यात यावे. यासाठी जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून नावीन्यपूर्ण योजनेअंतर्गत निधीची तरतूद करण्याची सूचना मंत्री देसाई यांनी जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांना केली.

0 2 OCT 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# देसाई अध्यासनासाठी अडीच कोटी मिळवून देऊ

## शंभूराज देसाई यांची ग्वाही : अध्यासनाच्या कामकाजाचा घेतला आढावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनाच्या कामांना गती देण्याबरोबरच मंजूर तीनपैकी अडीच कोटींचा निधी तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी प्राधान्य दिले जाईल, अशी ग्वाही राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी शनिवारी येथे दिली.

अध्यासनाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी आयोजित देसाई बोलत होते. बैठकीस शिवराज देसाई, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, उच्च व तंत्रशिक्षण कोल्हापूर विभागाचे उपसंचालक हेमंत कठरे, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, अध्यासनाचे डॉ. अवनीश पाटील, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. भारती पाटील, डॉ. अरुण भोसले, व्ही. जी. पानस्कर उपस्थित होते.

देसाई म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या उभारणीमध्ये लोकनेते देसाई यांचा सिंहाचा वाटा आहे. प्रतिकूल परिस्थितीतही विद्यापीठ उभारणीमध्ये त्यांनी केलेले काम तसेच कृषी, शिक्षण व ग्रामविकास या क्षेत्रामध्ये त्यांनी केलेले काम नव्या पिढीसमोर गेले पाहिजे यासाठी अध्यासनाच्या माध्यामातून प्रयत्न व्हावा. अध्यासनामध्ये त्यांच्या जीवनकार्यावर, कार्यकर्तृत्वावर आधारित कला दालन करण्यासाठी आराखडा करा. या कामासाठी जिल्हा नियोजन मंडळाच्या नावीन्यपूर्ण योजनेतून निधीची तरतूद करू. डॉ. अवनीश पाटील यांनी अध्यासनाच्या कामांविषयी माहिती दिली.

लोकमत

# दूरशिक्षण ऑनलाईन केंद्र सुटीदिवशीही सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राचे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे सुटीच्या दिवशीही कार्यालय सुरू राहणार आहे, अशी माहिती उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे व संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी दिली. विद्यार्थ्यांसाठी केंद्राच्या मुख्य कार्यालयात मोफत बी.ए., बी.कॉम., एम.ए., (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमासाठी प्रवेश अर्ज भरून देण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे प्रवेश प्रक्रिया सुरू असेपर्यंत दुसरा व चौथा शनिवार, तसेच रविवार आणि शासकीय सुटीदिवशी कार्यालय सुरू राहणार आहे.

महासत्ता

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र सुट्टी दिवशीही सुरु राहणार

कोल्हापूर, ता. १ (प्रतिनिधी)–

.............................

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राचे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीची प्रवेश प्रक्रिया सध्या सुरु आहे. त्यामुळे सुट्टी असलेल्या दिवशी सुद्धा कार्यालय सुरु राहणार असल्याची माहिती उपकुलसचिव डॉ. एन.जे. बनसोडे यांनी दिली.

विद्यार्थ्यांसाठी केंद्राच्या मुख्य कार्यालयात मोफत बी.ए., बी.कॉम, एम.ए., (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम, एम.एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमांची प्रवेश अर्ज भरून देण्याची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. त्यामुळे प्रवेश प्रक्रिया सुरु असेपर्यंत दुसरा व चौथा शनिवार तसेच रविवार आणि शासकीय सुट्टी असलेल्या दिवशीसुद्धा कार्यालय सुरु राहणार आहे. विद्यार्थी, गृहिणी, कामगार, शेतकरी, उद्योजक, सैनिक आदींनी आपला प्रवेश आजच निश्चित करावा. तसेच, विविध कार्यालये, संस्था, खाजगी कंपनी अशा ठिकाणी काम करणाऱ्यांसाठीही दूरशिक्षणाचीही संधी असून त्यांनी या सुट्टीच्या कालावधीत प्रवेश घ्यावा, असे आवाहन संचालक प्रा.डॉ.डी.के.मोरे यांनी केले.

0 2 OCT 2022 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठामध्ये भूगोल विभागांतर्गत संशोधनपद्धती कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागात 'आयसीएसएसआर' संस्थेच्या वतीने सामाजिक शास्त्रामध्ये एम.फिल, पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दहा दिवसीय संशोधनपद्धती विषयावरील कार्यशाळेचे आयोजन केले होते.

कार्यशाळेचे उद्घाटन धारवाड येथील प्रा. डॉ. एस. टी. बागलकोटी, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी अधिष्ठाता प्रा. डॉ. एम. एस. देशमुख होते. प्रा. सबिहा हुसैन (दिल्ली), प्रा. विमल त्रिवेदी (गुजरात), प्रा. सादिक बाशा (तामिळनाडू), प्रा. सागर माळी (मुंबई), प्रा. बालाजी केंद्रे (पुणे) यांच्यासह प्रा. एस. डी. परदेशी, शिवाजी विद्यापीठातील विविध विषयतज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेची सांगता संशोधक विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन झाली.

पुढारी

# विद्यापीठाकडून उन्हाळी सत्रातील ५७२ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्र परीक्षेंतर्गत ५७२ परीक्षांचे निकाल जाहीर केले आहेत. विद्यापीठातर्फे ७४७ अभ्यासक्रमांपैकी विद्यापीठ स्तरावरील ५६१ परीक्षा एमसीक्यू ऑफलाईन पद्धतीने झाल्या आहेत. ३० सप्टेंबर रोजी बी. आर्किटेक्चर, एम.कॉम., एम.टेक., एम.ए. (मास कम्युनिकेशन), फाईव्ह इयर लॉ कोर्सचे निकाल घोषित झाले आहेत.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ भुगोल विभागात दहा दिवसीय कार्यशाळा उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागात. डॉ. जे. बी. सपकाळे यांनी विद्यार्थ्यांसाठी संशोधन पद्धतीवर १० दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्याची नुकतीच सांगता झाली. कार्यशाळेचे उद्‌घाटन डॉ. एम. एस. देशमुख, रजिस्ट्रार डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. एस. टी. बागलकोटी यांच्या हस्ते झाले. डॉ. जे. बी. सपकाळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एस. डी. शिंदे यांनी आभार मानले. कार्यशाळेसाठी प्रा. सबिहा हुसैन, प्रा.विमल त्रिवेदी, प्रा.सादिक बाशा, प्रा. सागर माळी, प्रा.बालाजी केंद्रे, प्रा. एस. डी. परदेशी यांनी मार्गदर्शन केले. सहभागी विद्यार्थ्यांना कार्यशाळेच्या सांगता प्रसंगी  प्रमाणपत्र देण्यात आली.